<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.३</u>

माझे नाव शिवशंकर जनार्धन अवकाळे,
वय : ४६ वर्षे, कामधंदा : लिपीक (कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव)
रा.तायडे कॉलनी, खामगांव, ता.खामगांव, जि.बुलढाणा.

<u>वादीचे विद्वान वकील श्री.यु.जानोरकार वकीलांमार्फत सरतपासणी शपथेवर सुरू.</u>

१. मी गेल्या २५ वर्षापासून रोजदारीने व गेल्या तीन वर्षांपासुन लिपीक या पदावर कायम झालो असून कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव येथे कार्यरत आहे. दिनांक ०१.०१.२०१९ रोजी उडदाचा भाव कमीत कमी ४,४००/– व जास्तीत जास्त ४,७००/– प्रति क्वींटल होता. दिनांक २२.०१.२०१९ रोजी उडदाचा भाव कमीत कमी ४,५००/– व जास्तीत जास्त ४,८००/– प्रति क्वींटल होता. दिनांक २६.०१.२०१९ व २७.०१.२०१९ रोजी शासकीय सुट्टी होती. दिनांक २६.०२.२०१९ रोजी उडदाचा भाव कमीत कमी ४,६००/– व जास्तीत जास्त ४,६००/– प्रति क्वींटल होता. दिनांक २७.०२.२०१९ रोजी उडदाचा भाव कमीत कमी ४,३००/– व जास्तीत जास्त ४,३००/– प्रति क्वींटल होता. दिनांक २८.०२.२०१९ रोजी सुट्टी होती. खामगांव व आसनगांवच्या बाजार पेठेत उडदाच्या भावात अंदाजे ३०० प्रति कवींटलचा फरक असतो.

सरतपास संपला.

समक्ष

**Sd**/–

दिनांक: २९.०४.२०२६ (व्ही. व्ही. जोशी)
ठिकाण: अकोला न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.